ePaper

**वाघ्या कुत्र्याचे इतिहासात पुरावे, शिल्प हटवू देणार नाही; लक्ष्मण हाके यांचा इशारा**

| वर्ष - 8 । अंक - 246 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™

## आतील पानांत


- गुजरातविरुद्ध पंजाबच‘किंग्ज’!
- दिल्लीच्या ऐतिहासिक विजयाचा हिरो!
- दिल्लीचा कोटींचा अर्थसंकल्प!
- अमेरिकेचे कच्च्या तेलावर निर्बंध


www.mahaenews.com | बुधवार, दि. 26 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### जयकुमार गोरे खंडणीप्रकरणात शरद पवार गटाचा हात; प्रभाकर देशमुख आरोपीच्या संपर्कात !

# मंत्र्याविरोधातील डाव, सुप्रिया, रोहितचे नाव !

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुराव्यानिशी सभागृहात केला गौप्यस्फोट !

। मुंबई ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून एक कोटीची खंडणी स्वीकारणाऱ्या महिलेबरोबर शरद पवार गटाचे नेते संपर्कात होते, असा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केला. त्यांनी खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांची स्पष्टपणे नावे घेतली, तसेच या गटाचे नेते प्रभाकर देशमुख हे सतत आरोपींच्या संपर्कात होते, असेही सांगून टाकले.**



विधिमंडळाचे अधिवेशन संपण्यासाठी आता केवळ एक दिवस शिल्लक राहिला आहे आणि या पार्श्वभूमीवर राज्यातील कायदा- सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यातच मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून एक कोटी खंडणी घेणाऱ्या महिलेला अटक झाली आहे, तो मुद्दा चर्चेला आला.

### फडणवीस कडाडले आणि सभागृह चिडीचूप..

या विषयावर बोलताना फडणवीस यांनी गौप्यस्फोट केला, की आरोपी महिलेचे सुप्रिया सुळे आणि रोहित पवार यांच्याबरोबर अनेक कॉल्स आहेत, ती महिला सतत यांच्या संपर्कात होती, त्याचप्रमाणे या सर्वांचे जवळचे नेते प्रभाकर देशमुख हे देखील सतत आरोपीच्या संपर्कात होते.

### हे संपूर्ण प्रकरण खंडणीचे..

हे संपूर्ण प्रकरण हे खंडणीसाठी होते, असे सांगून फडणवीस म्हणाले, की या महिलेचा राजकीय नेत्यांशी संपर्क होता. या प्रकरणाची संपूर्ण आणि सखोल चौकशी केली जाईल, आणि दोषींवर कारवाई देखील केली जाईल, असे फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.



### आरोपी संपर्कात, त्यांना ओळखते : सुळे

मंत्र्याकडून एक कोटीची रक्कम घेणारी महिला आणि यू- ट्युबर तुषार खरात यांना मी ओळखते असे प्रथम सुप्रिया सुळे यांनी मान्य केले. वृत्तपत्रांमध्ये आलेल्या बातम्या आणि इतर पत्रकार करतात, तेच खरात माझ्यासाठी करतो, असे त्या म्हणाल्या. मंत्र्यांनी संबंधित महिलेला एक कोटी रुपयाची रोकड दिली, याबद्दल मी पूर्वीच आश्चर्य व्यक्त केले आहे. एवढी रक्कम कुठून आणली याची प्रथम चौकशी झाली पाहिजे. एवढे मोठे व्यवहार रोखीने करण्यास केंद्र सरकारचा विरोध असतो. मग, ही रक्कम कशी आणि कुठून आणली, असा प्रश्न त्याने उभा केला आहे. एकूणच हे प्रकरण आता चांगलेच चिघळणार, असे संकेत मिळत आहेत.

### तिन्ही आरोपींशी प्रभाकर देशमुख यांचा संपर्क..

या प्रकरणातील तीनही आरोपींशी प्रभाकर देशमुख हे शंभरवेळा बोलले आहेत आणि संपर्कात आहेत. आणखी एक आरोपी आहे यू-ट्युबर तुषार खरात ! हे सर्वजण सतत एकमेकांशी संपर्कात होते. काहीही बोलणे झाले, तर त्याचे ते व्हीडिओ काढायचे आणि संमती घेऊनच पुढे पाठवायचे, असेही स्पष्ट झाले आहे.

### पुरावे हातात, पुराव्यानिशी बोलतो..

या प्रकरणी सर्व प्रकारचे पुरावे हाती आले असून त्यांचे कॉल रेकॉर्ड आणि व्हीडिओज देशमुख यांच्याकडे जात होते आणि त्यांच्याकडून उत्तरे येत, हे देखील त्यांनी सांगितले.

### सुप्रियाताईंनी आत्मचिंतन करावे..

रोज उठसूठ आरोप करत बसण्यापेक्षा सुप्रियाताईंनी आत्मचिंतन करावे, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे. याप्रकरणी सायंकाळी सुप्रिया सुळे यांनी देखील दिल्लीमध्ये पत्रकारांशी संवाद साधला, आणि खुलासा करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्र्यांनी याची सखोल चौकशी करावी आणि त्याला मी पूर्ण सहकार्य देईन असे सांगून सुप्रियाताई म्हणाल्या की चौकशीसाठी किंवा तपासणीसाठी मी माझा मोबाईल केव्हाही देण्यास तयार आहे.

ePaper

## वाघ्या कुत्र्याचे इतिहासात पुरावे, शिल्प हटवू देणार नाही; लक्ष्मण हाके यांचा इशारा

वर्ष - 8 । अंक - 246 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- गुजरातविरुद्ध पंजाबच 'किंग्ज'!
- दिल्लीच्या ऐतिहासिक विजयाचा हिरो!
- दिल्लीचा कोटींचा अर्थसंकल्प!
- अमेरिकेचे कच्च्या तेलावर निर्बंध


www.mahaenews.com | बुधवार, दि. 26 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### "मुंबई पोलीस बेटिंगला सहकार्य करत आहेत

# अंबादास दानवेंचा 'पेन ड्राइव्ह बॉम्ब'!

## पोलिस अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप; दानवे यांच्या दाव्याने खळबळ

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**मुंबई पोलीस हे बेटिंगला सहकार्य करत आहेत. त्याचे पुरावे पेन ड्राईव्हमध्ये आहेत असं म्हणत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी एक पेन ड्राइव्ह अध्यक्षांना दिला आहे. तसंच मुंबई पोलिसांच्या उपस्थितीत पाकिस्तानी खेळाडूंशी संपर्क केला जातो आहे. बेटिंगमध्ये अनेक पोलीस अधिकारी आहेत असा गंभीर आरोप दानवे यांनी केला आहे.**

अंबादास दानवेंचा आरोप काय? माझ्याकडे अनेक फसवणुकीच्या घटना आहेत, खालच्या सभागृहात बेटिंग ॲपबाबतही बोलणं झालं आहे. मी एक पेन ड्राइव्ह आपल्याला देत आहे. क्रिकेट बेटिंग ॲप आहे लोटस २४ नावाचं. यामध्ये मेहुल जैन, हिरेश जैन, कमलेश जैन हे लोक सातत्याने बेटिंग करतात. पाकिस्तानातील खेळाडूंशी हे संपर्क ठेवून आहेत. खुलेआमपणे बेटिंग चालतं. मुंबई पोलिसांमधल्या मोठ्या अधिकाऱ्यांसह बैठक होते. चॅम्पियन्स ट्रॉफी संपली आता



आयपीएलसाठी मुंबईत ही मंडळी काम करत आहेत. पेन ड्राइव्ह ऐका म्हणजे पाकिस्तानातल्या लोकांशी बोलताना काय केलं आहे ते कळेल. कुठल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावं आहेत ते पण कळेल. अशा पद्धतीने पोलिसांच्या सहकार्याने राज्यात बेटिंगसारख्या घटना घडत आहेत. असा गंभीर आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे.

**पोलीस अधिकारी सत्ताधाऱ्यांची हुजरेगिरी करण्यात गुंतले आहेत-अंबादास दानवे**

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पाहिला तर पोलीस अधिकारी सत्ताधाऱ्यांची हुजरेगिरी करण्यात गुंतले आहेत असंही अंबादास दानवेंनी म्हटलं आहे. माझ्याकडे अनेक उदाहरणं आहेत. एका मंत्र्याच्या सांगण्यावरुन महिलेला कसं फसवलं जातं? महिलेने लाच स्वीकारली असेल पण मंत्र्यावर गुन्हा आहेच. पत्रकाराला अटक झाली पण मंत्र्यावर गुन्हा आहेच. पोलिसांचा वापर केला जातो आहे. पोलीस यंत्रणा व्यक्तिगत कामांसाठी मंत्री वापरत आहेत.

### अहिल्यानगर या ठिकाणी काय घडलं?

महसूल विभागाची काही प्रकरणं आहेत. राज्य सरकारमधले मंत्री, आमदार कसे वागतात त्याचं उदाहरण देतो. अहिल्यानगर या ठिकाणी बऱ्हाणपूर नावाचं गाव आहे तिथे तुळजाभवानीचं मंदिर आहे, तिथे एक भगत नावाचे पुजारी आहेत. तसंच या ठिकाणी एक प्रवेशद्वार आहे याबाबत अनेकजण असं म्हणतात की अनेक पोथ्या, अख्यायनं यामध्ये त्याचा उल्लेख आहे. निवडणूक काळात या भागातले अभिषेक भगत हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या विचारांचे आहेत. त्यांनी त्या पक्षाचा प्रचार केला म्हणून कर्डिले नावाचे आमदार आहेत. त्यांनी हे प्रवेशद्वार आणि अंबिका भवन पाडलं, त्यासाठी महसूल विभागाला हाताशी धरलं होतं. हिंदुत्ववाद म्हणत असताना याकडे लक्ष द्यायची गरज आहे. कलेक्टरला फोन केला असता अनधिकृत बांधकामं अनेक आहेत असंही कळलं. जे विरोधात आहेत त्यांच्यावर कारवाई केली जाते असा प्रकार घडला आहे.

### भयानक ! पुण्यात कचऱ्यात आढळली 6-7 अर्भकं

## प्लास्टिकच्या बरण्यांमध्ये अर्भक सापडल्याची माहिती,धक्कादायक प्रकारामुळे खळबळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील दौंडमध्ये कचऱ्यामध्ये 6 ते 7 अर्भकं आढळली आहेत. प्लास्टिकच्या बरण्यांमध्ये ही अर्भक सापडल्याची माहिती समोर आली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे दौंडच्या बोरावकेनगरमध्ये प्रचंड खळबळ माजली आहे. ही अर्भकं कुठून आली पोलिसांकडून यासंदर्भात शोध सुरू आहे.**



पुण्यातील दौंडमध्ये ही धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दौंडच्या बोरावके नगरमध्ये एका कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये 6 ते 7 अर्भकं ही आढळून आली आहेत. प्लास्टिकच्या बरणीमध्ये ती अर्भकं सापडली आहेत. त्यामध्ये अर्बकांचे काही शारीरिक अवशेष आढळले आहेत, अशी माहिती समोर आली आहे. यासंदर्भात तेथील स्थानिकांनी दौंड पोलिस स्टेशनमध्ये जाऊन माहिती दिली. त्यानंतर दौंड पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. ही अर्भकं नेमकी कोणाची आहेत, कोणत्या रुग्णालयाने ती फेकून दिली आहेत का, या अनुषंगाने सध्या दौंड पोलिसांकडून तपास सुरू आहे.

### राज्य महिला आयोगाकडून ट्विट

राज्य महिला आयोगाकडून यासंदर्भात ट्विट करण्यात आलं आहे. ' पुणे जिल्ह्यात दौंड तालुक्यात बोरावकेनगर मध्ये कचऱ्याच्या ढिगाऱ्यात अर्भक व मानवी अवशेष सापडल्याची बातमी माध्यमातून समोर आली आहे. सद्यस्थितीत दौंड पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून डॉक्टरांच्या पथकामार्फत तपासणी केली आहे. पोलिसांनी याचा तपास व रुग्णालयाची चौकशी सुरू केली आहे.हे मानवी अवशेष रुग्णालयाकडे अभ्यासासाठी 2020 पासून आहेत आणि नजरचुकीने कचऱ्यात गेले अशी प्राथमिक माहिती आहे. राज्य महिला आयोग तातडीने तपास पूर्ण करण्याच्या सूचना देत वस्तुस्थितीदर्शक अहवाल आयोगास सादर करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत,' असे त्यामध्ये नमूद करण्यात आलं आहे.

## स्वाभिमानीचे अध्यक्ष राजू शेट्टी यांचे मत

# सध्याचे राज्यकर्ते औरंगजेबापेक्षा वाईट

## उसाची किफायतशीर रक्कम (एफआरपी) एकरकमी द्यावी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सध्याचे राज्यकर्ते आमच्याबरोबर औरंगजेबापेक्षा वाईट वागतात, अशी टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी येथे मंगळवारी केली. प्रशांत कोरटकरला पकडण्यासाठी एक महिना का लागला, अशी विचारणाही शेट्टी यांनी केली. राजू शेट्टी यांनी मंगळवारी साखर आयुक्तालयात साखर आयुक्त सिद्दराम सलीमथ यांची भेट घेतली.**



ऊस उत्पादकांना उसाची रास्त आणि किफायतशीर रक्कम (एफआरपी) एकरकमी द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानंतरही कारखान्यांनी रक्कम थकविली आहे. त्यामुळे या रकमेवर शेतकऱ्यांना व्याज देणे बंधनकारक करावे, या मागणीसाठी ही भेट त्यांनी घेतली. त्यावेळी पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. पृथ्वीराज जाचक आणि ॲड. योगेश पांडे यावेळी उपस्थित होते.राज्यासमोरील महत्त्वाच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी कोरटकर, राहुल सोलापूरकर अशा माणसांचे मुद्दे पुढे केले जात आहेत. शेतकऱ्यांची तब्बल सात हजार कोटींची एफआरपी कारखान्यांनी थकविली आहे. त्यावर कोणी बोलू नये, यासाठी संवेदनशील विषयांवर बोलण्यासाठी प्यादी पुढे केली जात आहेत, अशी टीका शेट्टी यांनी केली.ते म्हणाले की, प्रशांत कोरटकर हा चिल्लर माणूस असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते. मात्र, या चिल्लर माणसाला पकडण्यासाठी एक महिन्यांचा कालावधी का लागला. याचे उत्तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी द्यावे.' 'सर्वसामान्यांचे प्रश्न मागे पडले आहेत आणि महत्त्वाच्या प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी संवेदनशील विषयांवर जाणीवपूर्वक विधाने करण्यासाठी माणसांची पेरणी केली जात आहेत. संवेदनशील विषय पुढे करून लोकांना भडकाविण्याचे काम करून अपयश सरकार लपवत आहे, असेही शेट्टी म्हणाले.दरम्यान, एफआरपी एकरकमी द्यावी, असा न्यायालयाचा आदेश आहे. त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार कोणालाही नाही. मात्र, राज्य शासनाने दोन टप्प्यात एफआरपी द्यावी, असा निर्णय घेतला आहे. हा निर्णय बेकायदा आहे. कारखाने रक्कम देण्यास टाळाटाळ करत आहेत. एफआरपीची रक्कम न देणाऱ्या कारखान्यांवर साखर आयुक्तांनी कारवाई करावी, अशी मागणी शेट्टी यांनी केली. आणि किफायतशीर रक्कम (एफआरपी) एकरकमी द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानंतरही कारखान्यांनी रक्कम थकविली आहे. त्यामुळे या रकमेवर शेतकऱ्यांना व्याज देणे बंधनकारक करावे, या मागणीसाठी ही भेट त्यांनी घेतली. त्यावेळी पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. पृथ्वीराज जाचक आणि ॲड. योगेश पांडे यावेळी उपस्थित होते.कोरटकर, राहुल सोलापूरकर अशा माणसांचे मुद्दे पुढे केले जात आहेत.

### कोरटकर हा चिल्लर माणूस

शेतकऱ्यांची तब्बल सात हजार कोटींची एफआरपी कारखान्यांनी थकविली आहे. त्यावर कोणी बोलू नये, यासाठी संवेदनशील विषयांवर बोलण्यासाठी प्यादी पुढे केली जात आहेत, अशी टीका शेट्टी यांनी केली.ते म्हणाले की, प्रशांत कोरटकर हा चिल्लर माणूस असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते.

---

## दहा हजार इमारतींचा स्वयंपुनर्विकास

## पुण्यातही सोसायटी आणि अपार्टमेंटकडून प्रक्रियेला चालना

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबईप्रमाणे पुण्यातील सोसायट्यांनीही स्वयंपुनर्विकासाला प्राधान्य दिले असून, सुमारे १० हजार सोसायट्या, अपार्टमेंटनी त्यासंबंधीची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू केली आहे. येत्या काळात पुणे शहर आणि जिल्ह्यातील २५ हजार गृहनिर्माण सोसायट्या आणि अपार्टमेंट्चा पुनर्विकास अपेक्षित आहे.**



राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) साखर कारखान्यांना ज्या प्रमाणे कर्ज देते, त्या धर्तीवर गृहनिर्माण सोसायट्यांनाही स्वयंपुनर्विकासासाठी 'एनसीडीसी' कडून कर्ज स्वरूपात पैसे उपलब्ध करून दिले जातील. त्यासाठी केंद्रीय स्तरावरून येत्या तीन महिन्यांत 'एनसीडीसी'च्या उपविधींमध्ये बदल केले जातील,' अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात रविवारी केली. या पार्श्वभूमीवर शहर आणि जिल्ह्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटचा आढावा महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाकडून 'लोकसत्ता'ने घेतला. महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन यांनी याबाबत माहिती दिली.पटवर्धन म्हणाले, 'पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागात २६ हजार ५०० नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था आणि ४० हजार अपार्टमेंट अशा एकूण ६६ हजार ५०० संस्था आणि अपार्टमेंट आहेत. त्यापैकी ४० टक्के म्हणजे २५ हजार संस्था आणि अपार्टमेंटचा पुनर्विकास अपेक्षित आहे. या २५ हजारांमधील १० हजार गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटनी स्वयंपुनर्विकासाची तयारी दर्शविली आहे.'स्वयंपुनर्विकास करण्यासाठी इच्छुक सोसायट्यांसाठी राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाने 'स्वयंपूर्ण विकास योजना' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वयंपुनर्विकास करू इच्छिणाऱ्या संस्थांना याअंतर्गत वाजवी दरामध्ये कर्जपुरवठा करण्यात येणार आहे. स्टील, सिमेंट, विद्युत उपकरणे थेट कंपन्यांकडून खरेदी करण्यात येतील.

### एनसीडीसी'कडून कर्ज उपलब्ध

संबंधित कंपन्यांबरोबर तसे करार केले जातील. राज्य आणि जिल्हा सहकारी बँकांना त्यांच्या एकूण मालमत्तेच्या पाच टक्के दराने कर्जपुरवठा करण्यासही मान्यता मिळाली आहे. त्यामुळे स्वयंपुनर्विकासाच्या प्रक्रियेलाही गती मिळणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतर आता 'एनसीडीसी'कडून कर्ज स्वरूपात पैसे उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा होईल.

## एसटीपी प्लांट मधील कचऱ्याला आग

# पिंपळे गुरव, कासारवाडी परिसरात धुराचे ढग!

## चार दिवसांपासून वायु प्रदूषणात मोठी वाढ

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या चार दिवसांपासून पिंपळे गुरव, कासारवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे साम्राज्य निर्माण झाले आहे. सातत्याने धूर असल्याने घरातील लहान मुले, वयोवृद्ध, आजारी रुग्ण यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. मॉर्निंग वॉकसाठी जाणाऱ्या नागरिकांनी धुरामुळे बाहेर जाणे बंद केले आहे. पहाटेच्या वेळी धुक्याची चादर पांघरल्याप्रमाणे धुराचे ढग दिसून येत आहेत.**





कासारवाडी येथील महापालिकेच्या एसटीपी प्लांटमधील कचऱ्याला आग लागल्याने गेल्या चार दिवसांपासून या परिसरात मोठ्या प्रमाणात धुराचे लोट निर्माण झाले आहेत. या मुळे परिसरात मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असून नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. दरम्यान, एसटीपी प्लांटमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग कसे आले, येथील कचरा वेळेवर का उचलला जात नाही, चार दिवस शहर प्रदूषित झाल्याप्रकरणी महापालिका संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? असे प्रश्न नागरिक विचारत आहेत.

एसटीपी प्लांटमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. त्यामुळे येथे गाळ स्वरूपात कचरा निर्माण होतो. हा गाळ वेळोवेळी उचलून कचरा डेपोमध्ये पाठविला जातो. मग, प्लास्टिक कागद, काचेच्या बाटल्या, राडारोडा हा कचरा प्लांटमध्ये कसा आला, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. दरम्यान एकरभर जागेत असलेल्या शेकडो झाडांना या आगीची झळ पोहचली आहे. याआधी मध्ये शेकडो झाडे जळाली असल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत

> जल निस्सारण केंद्राच्या जागेमध्ये पडलेला कचरा हा केवळ जलनिसारण केंद्रातील रॉ मटेरियल आहे. त्यात प्लास्टिकचा कचरा नाही.
>
> **–माधुरी पडवळ,** कनिष्ठ अभियंता.



### एसटीपी प्लांटचा कारभार रामभरोसे?

या आगीच्या घटनेमुळे एसटीपी प्लांटचा कारभार रामभरोसे आहे का असा सवाल उपस्थित झाला आहे. या ठिकाणी कचऱ्याच्या ढिगाऱ्याचे वर्गीकरण करून त्याची संख्या नोंद करण्यात आली नाही. जागेवर आकडेवारी न करता ऑफिसमध्ये जाऊन आम्ही पंचनामा करतो, वरिष्ठांना माहिती सांगतो, असे सांगण्यात आले. सुरक्षारक्षकाकडे कचऱ्याच्या गाड्या आल्या किंवा गेल्याची नोंद नाही. एवढ्या मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा कसा जमा झाला. याचेही उत्तर संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांना देता आलेले नाही.

---

## आयोग निर्माण होईपर्यंत मागे हटणार नाही!

### ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे यांचा निर्धार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।




देशभरातील लाखो ऑटो, टॅक्सी, बस ट्रकचालकांच्या मागण्यांकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करत आहे. त्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी अनेक वर्ष लढा दिला जात आहे. राष्ट्रीय चालक आयोग निर्माण झाले पाहिजे. देशभरातील चालकांसाठी कल्याणकारी बोर्ड निर्माण करून त्या माध्यमातून त्यांना सामाजिक सुरक्षा म्हातारपणी पेन्शन व इतर योजनांचा लाभ मिळाला पाहिजे, ओला उबेर या भांडवलदार कंपन्यांवरती बंदी आणली पाहिजे टू व्हीलर टॅक्सीला देशभरामध्ये बंद केली पाहिजे, इलेक्ट्रिक वाहनांचे धोरण ठरवताना पूर्वीचे वाहन वरती कोणतीही बाधा येणार नाही यासाठी सर्व संघटनांना विश्वासात घेण्यात यावे, यासह इतर विविध मागण्यांसाठी नुकतेच दिल्ली येथील जंतर मंतर वरती देशपापी आंदोलन करण्यात आले या आंदोलनातील मागण्या मान्य होईपर्यंत मागे हटणार नाही असा निर्धार ऑटो टॅक्सी ट्रान्सपोर्ट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष बाबा कांबळे यांनी व्यक्त केला. दिल्ली जंतर मंतर येथे देश वापी आंदोलन आयोजित करण्यात आले या वेळी मार्गदर्शन करताना बाबा कांबळे बोलत होते. कष्टकरी, श्रमिक नेते बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली 21 मार्च 2025 रोजी जंतर-मंतर येथे आंदोलन करण्यात आले, 23 तारखेला राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते यासाठी देशभरातील सर्व 28 राज्यातून प्रतिनिधी उपस्थित होते.


यात मिर मोहम्मद शफी,(कश्मीर) अज्जू प्रसाद मंडोली (ओडिसा) सुरेंद्र प्रसाद (पंजाब) मनोज कुमार साहू , वासू एलडी(आंध्र प्रदेश) के.डी.गिल (राजस्थान) रवी रेड्डी (कर्नाटका) आनंद तांबे, राकेश शिंदे (महाराष्ट्र) शिन्तल कुमार (तामिळनाडू) प्रीतम सिंग (छत्तीसगड) गुलजार सिंग (उत्तराखंड) नरेंद्र ठाकूर (हिमाचल प्रदेश ) निजामुद्दीन भाई, विनोद तिवारी (आसाम) भूपेंद्र यादव (बिहार) धर्मेंद्र यादव (दिल्ली एनसीआर) डॉ राजीव मिश्रा (उत्तर प्रदेश)

### सरकार देशभरातील चालकांकडे सहानुभूतीने बघत नाही

बाबा कांबळे म्हणाले केंद्र सरकार देशभरातील 25 करोड चालकांकडे सहानुभूतीने बघत नाही. त्यामुळे वारंवार निवेदने, आंदोलन करूनही मागण्या सोडविण्याबाबत सरकार उदासीन आहे. देशातील 25 कोटी चालकांसाठी राष्ट्रीय चालक आयोग निर्माण झाले पाहिजे. तसेच चालकांसाठी कल्याणकारी योजना स्थापन झाले पाहिजे. त्यामधून चालकांचे कल्याण होणार आहे. म्हातारपणी पेन्शन मिळाल्यास त्यांना आधार होणार आहे. यासह सामाजिक सुरक्षा योजना मिळावे, यासाठी वेलफेअर बोर्ड म्हणजे कल्याणकारी मंडळ स्थापन झाले पाहिजे. केंद्रीय पातळीवर हे कल्याणकारी महामंडळ स्थापन व्हावा. अन्यथा न थकता आंदोलन सुरूच राहील, असे बाबा कांबळे म्हणाले.

# बिन कामाच्या कामराचा नेमका बोलविता धनी कोण ?

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंच केवळ कर्तव्यकर्म म्हणून करा.

एका माणसाला विडी ओढण्याचे फार व्यसन होते. तो आजारी पडल्यावर त्याने डॉक्टरांना सांगितले, ‘मला तुम्ही औषध दिले तरी मी विडी सोडणार नाही.’ त्याचा डॉक्टर फार हुशार होता. त्याने त्याला एक गोळी देऊन, विडी ओढण्यापूर्वी ती तोंडात धरीत जा म्हणून सांगितले. त्या गोळीमुळे विडीच्या तंबाखूचे विष त्याला बाधत नसे. तसे आपण प्रपंच करताना वागले पाहिजे. प्रपंच आम्हांला सुख देईल ही आमची कल्पनाच नाहीशी झाली पाहिजे. म्हणजे प्रपंचाची हावही कमी होईल, आणि नंतर कर्तव्यापुरतेच आम्ही प्रपंचात राहू. जोपर्यंत प्रपंचाकडे आमची दृष्टी आहे तोपर्यंत आम्हाला समाधान कालत्रयीही मिळणे शक्य नाही. प्रारब्धाने प्रपंच आला आहे, तो कर्तव्यकर्म म्हणून करीत जा, पण त्यात सुख मिळणार आहे या कल्पनेने तो करू नका. प्रपंची लोकांचा स्वभाव फार विचित्र आहे; त्यांना खरे सांगितले तर ते आवडत नाही. वास्तविक आपण प्रपंचातले संबंधी लोक कामापुरते एकत्र जमतो. पाचजण मिळून प्रपंच बनतो. त्यांमध्ये प्रत्येकजण स्वार्थी असतो. मग सुख एकट्यालाच मिळणे कसे शक्य आहे ? नुसता प्रपंच तापदायक नाही, आकुंचित प्रपंच तापदायक आहे.

आपले खरे समाधान भगवंताजवळ आहे ही खूणगाठ पक्की बांधून प्रपंचात वागा. ज्याप्रमाणे व्यापारात नफा व्हावा म्हणून व्यापार करतात, तो होत नसेल तर व्यापारात काहीच तथ्य नाही, तसेच प्रपंचात समाधान हा नफा आहे; तो जर मिळत नसेल तर प्रपंचाचा लोभ धरण्यात काय फायदा आहे ? ‘तुझ्या असमाधानाचे कारण नक्की सांग’, असे जर आपण एखाद्याला विचारले, तर त्याला खात्रीलायक कारण सांगता येणार नाही. याचा अर्थ असा की, तत्त्वदृष्ट्या समाधान व्हायला खरोखरीच कशाची जरुरी नाही; पण ही गोष्ट कुणाला पटत नाही. आहे त्या अवस्थेमध्ये आपले समाधान टिकत नाही, आणि पाहिजे ती वस्तू मिळाली तरी आपण पूर्ण सुखी होत नाही. कैदेतल्या माणसाला ‘मी सुखी आहे’ असे वाटणे कधी शक्य आहे का ? तशी प्रपंची माणसाची अवस्था आहे. खरोखर, प्रपंचात समाधान, आनंद मिळत नाही हे अगदी सर्वांना कळते; परंतु शहरातले लोक केवळ अभिमानामुळे आणि खेड्यातले लोक अज्ञानामुळे, जसे वागायला पाहिजे तसे वागत नाहीत. या प्रपंचात राहूनसुद्धा भगवंताचे प्रेम आणि समाधान आम्हांला कसे मिळविता येईल, याचा आपण आधी विचार करायला पाहिजे. नामाच्या सहवासात राहिल्याने देहावरचे प्रेम आपोआप नष्ट होईल, आणि मग देहाने मांडलेल्या प्रपंचावरचेही प्रेम कमी होईल, आणि पुढे त्याला सर्वत्र परमेश्वरच दिसेल.

**बोधवचन:- प्रपंच सुखाचा करणे याचेच नाव परमार्थ होय.**



**‘स्टेट’मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**कुणाल कामरा याच्या कथित हास्य-व्यंग विडंबनामुळे गेले दोन दिवस माध्यमे, राजकारणी यांच्या दृष्टीने कारणी लागले. ‘उबाठा गटा’ चे नेते संजय राऊत यांनी कामराचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा व्हिडीओ शेअर केला आणि व्हायचे तेच झाले..नंतर शिंदे समर्थकांनी अक्षरशः राडा केला.**

### आदित्य - कामराचे धनिष्ठ संबंध?


या मोहऱ्याचा बोलविता धनी कोण? यावर उद्धव ठाकरे, संजय राऊत हेच बोलवते धनी आहेत, असे सत्तारूढ पक्षाचे मत आहे. स्टुडिओ भाड्यासाठी पैसे दिले आणि ती संहितादेखील उबाठा गटानेच दिली असावी, असा आरोप आता होत आहे. यातील तथ्य किती, हा वेगळ्या चर्चेचा मुद्दा. मात्र, आदित्य ठाकरे यांचे आणि कुणाल कामरा याचे घनिष्ठ संबंध आहेत, याची पुष्टी देणे सुरु आहे.

### लक्ष विचलित करण्याची ‘दिशा’..

हे प्रकरण काही असले तरी दिशा सालियन प्रकरणावरून लक्ष विचलित करण्यासाठी ठाकरे गटाने हा उद्योग केला आहे, असे नितेश राणे यांचे म्हणणे आहे. तसे ते सत्तारूढ पक्षातील अनेकांचे म्हणणे आहे. आता, पुन्हा गंमत अशी आहे की , हे सत्तारूढ आणि विरोधी हे दोन्ही पक्ष दर दोन दिवसांनी एकमेकांवर लक्ष विचलित करत असल्याचा आरोप करत आहेत. म्हणजे सरपंच देशमुख यांची हत्त्या, महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, कृषी मालाचे दर, टोल अशा अनेक मुद्द्यांवरून सत्ताधारी भाजपा, मित्रपक्षांना जनता आणि विरोधकांचे लक्ष हटवायचे होते, म्हणून औरंगजेब, दिशा सालियन आदी प्रकरणे काढली. हा आरोप अर्थातच विरोधी पक्षांचा आहे. तर दिशा सालियन प्रकरण अंगाशी आल्यामुळे ठाकरे आणि मित्रपक्षांना कुणाल कामराचा विषय सुरु केला, असे महायुतीचे म्हणणे आहे. कराड वरून लक्ष हटवण्यासाठी आरक्षण , जरांगे आणले. तर जरांगे याच्यावरून विषय बदलावा म्हणून वाल्मिक कराड आणि देशमुख यांचे प्रकरण सुरु झाले.

### मग अधिवेशन नेमके कशासाठी?

आता हे सगळे विषय एका विषयावरून दुसऱ्या विषयाकडे लक्ष पांगवण्यासाठी असतील, तर अधिवेशन कोणासाठी आणि का चालवले जात आहे ? अर्थसंकल्पीय अधिवेशनात आर्थिक मुद्द्यांवर किती चर्चा झाली ? विरोधक आर्थिक मुद्यांवरून



सरकारला घेरण्यासाठी किती सज्ज आहेत ? सभागृहात नसलेली, प्रवक्ते मंडळी पक्षाची भूमिका मांडताना किती सवंग बोलतात, हे वारंवार दिसत असताना जनतेने दररोज तोच तो मौखिक ,मानसिक अत्याचार सहन का करायचा असा प्रश्न पडतो.

### मुख्य मुद्दा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा..

आता मुद्दा येतो तो अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा ! कुणाल कामरा हा कलाकार आहे का ? असा प्रश्न त्याचे व्हीडिओ पाहून मनात येतो. (अनेकांना तो आज समजला.) सुमार दर्जाचा त्याचा कार्यक्रम मुंबई आणि महानगरातली मंडळी पैसे देऊन का पहातात, हे कळत नाही. त्यात ना दर्जा, ना पातळी, ना विचार, ना संकल्पना, ना विषयाचे गांभीर्य.. अशा या कलाकाराचे कार्यक्रम अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणून नाही तर दर्जाशून्य कार्यक्रम म्हणून थांबवले पाहिजेत. इतक्या उथळ आणि फालतू कार्यक्रमांनी शिंदे समर्थकांनी अस्वस्थ व्हायचे कारण नव्हते. कुणाल कामराला जो पर्यंत चांगला कार्यक्रम तुझ्याकडून होत नाही, तो पर्यंत कार्यक्रम कर, अशी सक्ती करायला पाहिजे होती. मारहाण आणि तोडफोड करण्यापेक्षाही शिक्षा जास्त होती.

### राजकारणाची दया येऊ लागते!

..आणि समजा खरंच सुपारी घेऊन त्याने बदनामीचे कार्यक्रम करण्यापेक्षा खरोखर मनोरंजन करणे अधिक योग्य होते. केवळ व्यक्तिगत बदनामी हा हेतू  कुणाल कामराच्या त्या सादरीकरणात आहे. त्यावर आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांनीच, त्यांच्या समर्थकांनी शिंदेच गद्दार असल्याचे कामराच्या गाण्यांनी सिद्ध केले असे म्हणतात. तेव्हा एकूणच राजकारणाची दया यायला लागते. (एका नेत्याबद्दल समाजमाध्यमांवर फिरत असलेली पोस्ट रिपोस्ट केली म्हणून एका महिला कलाकाराची धिंड गावोगावी काढली होती . गुन्हे नोंदवले होते, हे जरा आठवा. आदित्य ठाकरे यांच्या आठवणीसाठी.)

### नेमकी गद्दारी कोणाची ?

गद्दारी कोणी केली, याचा मागोवा घेतला तर कथा उद्धव ठाकरे यांच्यापर्यंत जाईल. सन २०१९ मध्ये ‘युती’ ला मतदारांनी निवडून दिले असताना राष्ट्रवादी आणि काँग्रेस बरोबर जाण्यात इमानदारी होती का ? भाजपा ने फसवले, असे गृहीत धरले तर तो त्या दोन पक्ष प्रमुखांचा मामला होता. बंद खोलीत पक्ष आणि मतदारांचे भवितव्य ठरवणारे ठाकरे कोण ? अमित शहा यांच्या बरोबर बैठक मोकळ्या मैदानात करायची होती आणि तरी वाटाघाटीत जमले नव्हते, तर स्वतंत्र राहायचे होते. काँग्रेसशी आणि राष्ट्रवादीशी गळ्यात गळा घायलायचे कारण काय होते ? बंद खोलीत कोणते इतर मुद्दे चर्चेत घेतले, हे सांगायचे उद्धव ठाकरे यांनी आजअखेर कधीच कष्ट घेतले नाहीत. केवळ मुख्यमंत्रीपदाचा एकच मुद्दा बोलला गेला का ? हे कधीतरी स्पष्ट करावे. आता आजच्या सगळ्या राजकारणी मंडळींनी गद्दारी हा शब्द कोणाही साठी वापरू नये.

### तत्त्व, नीती, आचरण, विचार... बासनात..

तत्व, नीती, आचरण, विचार यात प्रत्येकाने गद्दारी केली आहे. उगीच एकनाथ शिंदे गद्दार म्हणणे फारसे शहाणपणाचे नाही. पुन्हा एकदा राजकारणाच्या आजच्या विस्कटलेल्या घडीला केवळ आणि केवळ २०१९ सालात शरद पवार यांनी ज्या प्रकारे मोट बांधली आणि राजकारणाचा प्रवाह गढूळ केला, ते जबाबदार आहेत. कुणाल कामरासारखे फुटकळ कलाकार (?) राज्यसत्ता उलथवून टाकण्याच्या लायकीचे काही करत आहेत, असे म्हणणे म्हणजे आपल्या बुद्धीचे दिवाळे निघाले आहे असे जाहीर करणे होय...कामरा हे फुटकळ व्यक्तिमत्व आहे. त्याची लायकी, कर्तृत्व ,कलाकारी नगरसेवक पाडण्याचीही नाही. शिंदे यांनी ठाकरे यांच्याशी पंगा घेतला होता, तिथे त्यांना हा कामरा फार मोठा स्पर्धक नाही. कामराच्यात अजून बरीच परिपक्वता यायची आहे हे नक्की! सध्या तो बिन कामाचा आहे. आणि त्याला पाठिंबा देणारे रिकामे आहेत..

***सबब राज्यात कामराच्या फुटकळ कार्यक्रमापेक्षा महत्वाचे विषय खूप आहेत. त्यावर विचार आणि कृती करावी, त्यात सर्वांचे भले आहे!***


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्रातील किल्ले आमच्या ताब्यात द्या!

## राज्य सरकारची केंद्र सरकारकडे मोठी मागणी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे महाराष्ट्रातील सर्व किल्ले राज्य सरकारच्या ताब्यात द्यावेत, अशी मागणी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. शेलार यांनी केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांना पत्र लिहून ही विनंती नोंदवली. सध्या राज्यातील बहुतांश किल्ले भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत आहेत.**



त्यामुळे त्यांची दुरुस्ती किंवा विकासासाठी राज्य सरकारला भारतीय पुरातत्व विभागाची परवानगी घ्यावी लागते, ज्यामुळे अनेक अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हा पुढाकार घेतला आहे. रायगडासह राज्यातील अनेक महत्त्वाचे किल्ले भारतीय पुरातत्व विभागाच्या नियंत्रणाखाली आहेत. त्यामुळे या किल्ल्यांवर कोणतेही काम करण्यासाठी राज्य सरकारला केंद्राची परवानगी घ्यावी लागते. अनेकदा ही परवानगी मिळण्यास विलंब होतो किंवा ती नाकारली जाते. जर हे किल्ले राज्याकडे हस्तांतरित झाले, तर निर्णयप्रक्रिया गतिमान होईल आणि किल्ल्यांचे संवर्धन अधिक चांगल्या पद्धतीने होईल, असे सरकारचे म्हणणे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचे संरक्षण आणि संवर्धन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी हे किल्ले राज्याच्या पुरातत्व विभागाकडे हस्तांतरित करावेत, अशी मागणी शेलार यांनी केली. ते पुढे म्हणाले, राज्य सरकारच्या प्रयत्नांमुळे युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. तसेच, किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी जिल्हास्तरीय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहेत. हा ऐतिहासिक वारसा जपणे हे आमचे कर्तव्य आहे, आणि त्यासाठी आम्ही ठोस पावले उचलत आहोत.महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाचे साक्षीदार असलेले ५४ गडकिल्ले केंद्र सरकारच्या संरक्षणाखाली आहेत, तर ६२ किल्ले राज्य सरकारच्या ताब्यात आहेत. किल्ल्यांचे जतन, संरक्षण आणि देखभाल प्रभावीपणे करण्यासाठी सर्व किल्ले राज्याच्या अखत्यारीत हस्तांतरित करावेत, असे शेलार यांनी पत्रात म्हटले आहे. यामुळे दुरुस्ती आणि विकासाची कामे जलदगतीने होऊ शकतील, असा त्यांचा दावा आहे.त्यामुळे त्यांची दुरुस्ती किंवा विकासासाठी राज्य सरकारला भारतीय पुरातत्व विभागाची परवानगी घ्यावी लागते, ज्यामुळे अनेक अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने हा पुढाकार घेतला आहे. रायगडासह राज्यातील अनेक महत्त्वाचे किल्ले भारतीय पुरातत्व विभागाच्या नियंत्रणाखाली आहेत. त्यामुळे या किल्ल्यांवर कोणतेही काम करण्यासाठी राज्य सरकारला केंद्राची परवानगी घ्यावी लागते. अनेकदा ही परवानगी मिळण्यास विलंब होतो किंवा ती नाकारली जाते. जर हे किल्ले राज्याकडे हस्तांतरित झाले, तर निर्णयप्रक्रिया गतिमान होईल आणि किल्ल्यांचे संवर्धन अधिक चांगल्या पद्धतीने होईल, असे सरकारचे म्हणणे आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. तसेच, किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी जिल्हास्तरीय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहेत.

### 54 किल्ले केंद्राकडे, 62 राज्याकडे!

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाचे साक्षीदार असलेले ५४ गडकिल्ले केंद्र सरकारच्या संरक्षणाखाली आहेत, तर ६२ किल्ले राज्य सरकारच्या ताब्यात आहेत. किल्ल्यांचे जतन, संरक्षण आणि देखभाल प्रभावीपणे करण्यासाठी सर्व किल्ले राज्याच्या अखत्यारीत हस्तांतरित करावेत, असे शेलार यांनी पत्रात म्हटले आहे. यामुळे दुरुस्ती आणि विकासाची कामे जलदगतीने होऊ शकतील, असा त्यांचा दावा आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे महाराष्ट्रातील सर्व किल्ले राज्य सरकारच्या ताब्यात द्यावेत, अशी मागणी सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

# वाघ्या कुत्र्याची समाधी हटवू देणार नाही

## संभाजीराजेंच्या हेतूबाबत आम्हाला शंका आहे : लक्ष्मण हाके

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**संभाजीराजे छत्रपती यांनी वाघ्या कुत्र्याचं स्मारक रायगडावरुन हटवावं, इतिहासात वाघ्या कुत्रा असल्याचे पुरावे नाहीत. हे शिल्प कपोल कल्पित आधारावर तयार करण्यात आलं आहे असं म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. यासाठी त्यांनी ३१ मे पर्यंतची मुदत दिली आहे. मात्र यावरुन वाद होण्याची चिन्हं आहेत. कारण धनगर समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी वाघ्या कुत्र्याचं स्मारक हटवण्यास विरोध दर्शवला आहे.**





छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडावरील समाधीच्या समोर जे वाघ्या या कुत्र्याचं स्मारक आहे ते हटवण्यासाठी संभाजीराजे छत्रपतींनी ३१ मार्चपर्यंतच अल्टिमेटम दिला आहे. त्या संदर्भात तमाम ओबीसी आणि धनगर समाजाकडून माझी ही विनंती आहे की संभाजी राजे यांनी किल्ल्याचं संवर्धन केलं पाहिजे. मात्र रायगडची नासधूस ते करत आहेत. कुत्र्याचं स्मारक हटवण्यास आमचा विरोध आहे. आमचा दुसरा प्रश्न हा आहे की संभाजी राजेंनी ३१ मे ही तारीख का निवडली? यावर आमचा आक्षेप असा आहे की ३१ मे रोजी मातोश्री पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती असते. यावेळची जयंती ही त्रिशतकोत्तर आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी पंतप्रधानांना आणण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. त्याआधीच संभाजीराजे भोसलेंनी ३१ मे चा अल्टिमेटम का निवडला आहे हा आमचा प्रश्न आहे. विशाळगडाप्रमाणे वाघ्याच्या समाधीकडे लक्ष वेधून घेऊन महाराष्ट्रातलं वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न संभाजीराजे करत आहेत असा आमचा आरोप आहे.२०१२ मध्ये वाघ्याचा पुतळा संभाजी ब्रिगेडने काढून दरीत फेकला होता. त्यावेळी गृहमंत्री असलेल्या आर. आर. पाटील यांनी तो पुतळा आहे त्या ठिकाणी परत बसवला होता. आता संभाजीराजे आणि संभाजी ब्रिगेड यांनी जो उपक्रम हाती घेतला आहे त्याला आमचा विरोध आहे. ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा जिर्णोद्धार झाला त्यावेळी लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखाली ही समिती बसली होती, महात्मा ज्योतिराव फुलेही अध्यक्ष होते. तृतीय तुकोजीराव होळकर यांनी त्या समाधीसाठी आर्थिक मदत केली होती. छत्रपती शिवाजी मिलेट्री स्कूल या समोर जो पुतळा बांधला गेला त्यालाही होळकरांनी मदत केली होती. त्यामुळे आमचं म्हणणं असं आहे की ही जी त्यावेळची मंडळी होती त्यांच्याबाबत आणि त्यावेळच्या स्मारक समितीबाबत संभाजीराजे आणि काही इतिहासकारांना शंका आहे का?

### संभाजीराजेंची हकालपट्टी करा-हाके

रायगड विकास प्राधिकरणावरुन संभाजीराजे भोसले यांची हकालपट्टी व्हावी, विशाळ गडाची नासधूस त्यांनी केली आहे. आता वाघ्या कुत्र्याच्या समाधीची नासधूस करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. जर असं काही घडलं तर आमचा म्हणजेच तमाम धनगर समाजाचा त्याला विरोध असेल.

# दिल्लीचा एक लाख कोटींचा अर्थसंकल्प!

## मुख्यमंत्री गुप्ता यांनी ‘महिला समृद्धी योजने’साठी तिजोरी उघडली

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**दिल्लीमधील नवनिर्वाचित भाजपा सरकारने आज त्यांचा पहिला अर्थसंकल्प सादर केला. मुख्यमंत्री व अर्थमंत्री रेखा गुप्ता यांनी तब्बल १ लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडला आहे. यामध्ये दिल्लीतील पायाभूत सुविधा व महिला वर्गासाठीच्या ‘महिला समृद्धी योजने’साठी गुप्ता यांनी सरकारी तिजोरी उघडली आहे. महिला समृद्धी योजनेसाठी त्यांनी ५,१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ३० टक्के मोठा अर्थसंकल्प यंदा सादर करण्यात आला आहे.**



दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधी भाजपाने महिलांसाठी महिला समृद्धी योजनेची घोषणा केली होती. त्याचा निवडणुकीच्या मतदानावर चांगलाच परिणाम झाला. दशकभरापासून दिल्लीत सत्तेपासून दूर असलेली भारतीय जनता पार्टी पुन्हा सत्तेत आली आहे. राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर सरकारने या महिला समृद्धी योजनेसाठी महिलांची नोंदणी करण्यास सुरूवात केली आहे. दरम्यान, आता लवकरच या योजनची अंमलबाजवणी सुरू होईल, असं मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी विधानसभेत जाहीर केलं.ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांपेक्षा कमी आहे अशा कुटुंबांमधील महिलांना या योजनेअंतर्गत दर महिन्याला २,५०० रुपये दिले जाणार आहेत. हे पैसे थेट महिलांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. मध्य प्रदेशमधील ‘लाडली बहन’ व ‘महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजने’च्या धरतीवर भाजपाने ही योजना आणली आहे.दिल्लीमधील सांडपाण्याची व्यवस्था सुधारण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कनेक्टिव्हिटीसाठी एक हजार कोटी रुपये जाहीर करण्यात आले आहेत. राजधानीत १०० ठिकाणी अटल कॅन्टीन सुरू केले जाणार असून यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच दिल्लीकरांच्या सुरक्षिततेसाठी शहरात ५० हजार अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. गर्भवती महिलांसाठी २१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर, झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठी ६९६ कोटी रुपये, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या कामांसाठी ९,००० कोटी रुपये जाहीर करण्यात आले आहेत.यमुना नदीच्या स्वच्छतेसाठी वेगळी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधी भाजपाने महिलांसाठी महिला समृद्धी योजनेची घोषणा केली होती. त्याचा निवडणुकीच्या मतदानावर चांगलाच परिणाम झाला. दशकभरापासून दिल्लीत

### समृद्धी योजनेची अंमलबाजवणी

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधी भाजपाने महिलांसाठी महिला समृद्धी योजनेची घोषणा केली होती राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर सरकारने या महिला समृद्धी योजनेसाठी महिलांची नोंदणी करण्यास सुरूवात केली आहे. दरम्यान, आता लवकरच या योजनची अंमलबाजवणी सुरू होईल.

सत्तेपासून दूर असलेली भारतीय जनता पार्टी पुन्हा सत्तेत आली आहे. राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर सरकारने या महिला समृद्धी योजनेसाठी महिलांची नोंदणी करण्यास सुरूवात केली आहे. दरम्यान, आता लवकरच या योजनची अंमलबाजवणी सुरू होईल, असं मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी विधानसभेत जाहीर केलं.ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांपेक्षा कमी आहे अशा कुटुंबांमधील महिलांना या योजनेअंतर्गत दर महिन्याला २,५०० रुपये दिले जाणार आहेत. हे पैसे थेट महिलांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. मध्य प्रदेशमधील ‘लाडली बहन’ व ‘महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजने’च्या धरतीवर भाजपाने ही योजना आणली आहे.दिल्लीमधील सांडपाण्याची व्यवस्था सुधारण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कनेक्टिव्हिटीसाठी एक हजार कोटी रुपये जाहीर करण्यात आले आहेत. राजधानीत १०० ठिकाणी अटल कॅन्टीन सुरू केले जाणार असून यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच दिल्लीकरांच्या सुरक्षिततेसाठी शहरात ५० हजार अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. गर्भवती महिलांसाठी २१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर, झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासाठी ६९६ कोटी रुपये, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या कामांसाठी ९,००० कोटी रुपये जाहीर करण्यात आले आहेत. यमुना नदीच्या स्वच्छतेसाठी वेगळी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.

# अमेरिकेचे व्हेनेझुएलातील कच्च्या तेलावर निर्बंध

## अमेरिकेनं इशारा दिला व्हेनेझुएलाला, परिणाम होणार भारतावर

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यांच्या निर्णयांमुळे चर्चेत आले आहेत. राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. बेकायदा स्थलांतरितांना सक्तीने मायदेशी पाठवण्यापासून इतर देशांवर मोठ्या प्रमाणावर टेरीफ लागू करण्यापर्यंतच्या निर्णयांचा यात समावेश आहे.**



यासंदर्भात भारताबाबतही कठोर भूमिका घेण्याचे सूतोवाच त्यांनी आधीच केले असून आता त्यांच्या दुसऱ्या एका निर्णयाचा भारतावर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी व्हेनेझुएलाकडून कच्चं तेल आयात करणाऱ्या देशांवर SECONDARY TERIFF च्या नावाखाली नव्याने २५ टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय जाहीर केला आहे. जागतिक पटलावरील कमालीच्या अनिश्चित परिस्थितीमध्ये भारतानं एकाच देशावर अवलंबून न राहता वेगवेगळ्या देशांकडून कच्चं तेल आयात करण्याचं धोरण स्वीकारलं आहे.

पण अमेरिकेच्या या इशाऱ्याचा भारताच्या या धोरणाला धक्का बसण्याची शक्यता आहे. येत्या २ एप्रिलपासूनच हे कर लागू केले जाणार आहेत.

व्हेनेझुएलानं कायमच अमेरिकेच्या आणि अमेरिकेतील स्वातंत्र्याच्या विरोधात भूमिका घेतली आहे.

### चीनमध्ये कच्च्या तेलाची आयात

अवघ्या काही महिन्यांतच हे निर्बंध पुन्हा लादण्यात आले. मात्र, तरीही व्हेनेझुएलामधून काही प्रमाणात कच्चं तेल भारतासह इतर काही देशांमध्ये निर्यात होत होतं. विशेष म्हणजे २०२४ पर्यंत अमेरिका हा व्हेनेझुएलाकडून कच्च्या तेलाची आयात करणारा दुसरा मोठा देश होता. चीनमध्ये इथून सर्वाधिक कच्च्या तेलाची आयात केली जाते.

त्यामुळे त्यांच्याकडून कच्चं तेल किंवा नैसर्गिक वायू खरेदी करणाऱ्या कोणत्याही देशावर अमेरिकेशी होणाऱ्या व्यापारावर २५ टक्के कर आकारले जातील. यासंदर्भातली सर्व कागदपत्रे सही करून नोंद केली जातील. येत्या २ एप्रिलपासून नवे कर अंमलात येतील”, अशी माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये दिली आहे. दरम्यान, फायनान्शियल टाईम्सच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, विद्यमान शुल्काच्या व्यतिरिक्त हे २५ टक्के कर असतील, अशी माहिती डोनाल्ड ट्रम्प यांनी माध्यम प्रतिनिधींना दिली आहे. एकदा लागू झाल्यानंतर हे कर वर्षभरासाठी लागू असतील. भारतानं डिसेंबर २०२३ मध्ये जवळपास तीन वर्षांनंतर व्हेनेझुएलाकडून कच्च्या तेलाची आयात पुन्हा सुरू केली.

# भर कार्यक्रमात सोनू निगमवर दगडफेक



बॉलीवूडचा लोकप्रिय गायक सोनू निगमने आजवर त्याच्या अनेक गाण्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केलं आहे. त्याच्या आवाजातली गाणी आजही लोकांच्या ओठांवर असतात. सोनू निगमने अनेक चित्रपटांसाठी पार्श्वगायन केलं आहे. याशिवाय तो अनेक ठिकाणी लाईव्ह परफॉर्मन्सही करत असतो. या लाईव्ह परफॉर्मन्सला त्याला चाहत्यांकडून चांगला प्रतिसाद मिळतो. मात्र, नुकत्याच दिल्लीमध्ये झालेल्या लाईव्ह परफॉर्मन्समध्ये त्याला एका कठीण प्रसंगाचा सामना करावा लागला. कलाकारांसाठी लाईव्ह परफॉर्मन्समधील चाहत्यांचा रोष काही नवीन नाही. परंतु, कधीकधी या घटना दुर्दैवाने हिंसक होतात, ज्यामध्ये कोणीही जखमी होऊ शकते. सोनू निगमलाही अशाच एका घटनेला सामोरे जावे लागले.

# ‘चार दिवस सासूचे’ फेम अभिनेत्याची एन्ट्री!

छोट्या पडद्यावरील मालिका घराघरांत पाहिल्या जातात. लोकप्रिय मालिकांमध्ये अनेकदा कथानकानुसार नव्या कलाकारांच्या एन्ट्री केल्या जातात. 'स्टार प्रवाह'च्या अशाच एका लोकप्रिय मालिकेत एका बहुचर्चित अभिनेत्याची एन्ट्री होणार आहे. हे अभिनेते नेमके कोण आहेत पाहूयात... 'स्टार प्रवाह' वाहिनीवर सायंकाळी ७:३० वाजता रेश्मा शिंदे आणि सुमीत पुसावळे यांच्या प्रमुख भूमिका असलेली 'घरोघरी मातीच्या चुली' ही मालिका प्रसारित केली जाते. या मालिकेचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. या मालिकेत रेश्मा 'जानकी'ची तर, सुमीत 'हृषिकेश' ही भूमिका साकारत आहे.गेल्या काही दिवसांपासून या मालिकेत जानकी आणि हृषिकेश हे दोघं मिळून नानांचा ( हृषिकेशचे वडील ) शोध घेत असल्याचं पाहायला मिळत आहे. हृषिकेश संपूर्ण मुळशी गाव शोधून काढतो तरीही, त्याच्या हाती काहीच लागत नाही. ऐश्वर्याने मोठा प्लॅन बनवून नानांना किडनॅप केलेलं असतं. याचदरम्यान, एक पोलीस अधिकारी हृषिकेशच्या मागावर राहतो आणि त्याला चौकशीसाठी कधीही ताब्यात घेतलं जाईल असं सांगण्यात येतं. हृषिकेशच्या विरोधात केस लढण्यासाठी सयाजीरावांनी मोठ्या नावाजलेल्या वकिलांना बोलावलेलं असतं.



# मी इतकी भाग्यवान आहे

मोहन गोखले( यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक उत्तम मालिका व चित्रपटांत काम केले. 'मिस्टर योगी' या मालिकेतून त्यांना एक वेगळी ओळख मिळाली. मोहन गोखले यांनी 'हिरो हिरालाल', 'मोहन जोशी हाजीर हो' यांसारख्या अनेक सिनेमांत त्यांनी साकारलेल्या भूमिका अजरामर केल्या. मात्र, वयाच्या ४५ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आजही त्यांच्या अभिनयाविषयी बोलले जाते. त्यांचे लग्न अभिनेत्री शुभांगी गोखले यांच्याबरोबर झाले होते. त्यांना सखी ही मुलगी आहे. आता सखी गोखलेने एका मुलाखतीत वडिलांविषयी वक्तव्य केले आहे.सखी गोखलेने 'व्हायफळ' या पॉडकास्टला नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत मोहन गोखलेंविषयी बोलताना सखी म्हणाली, "माझा बाबा आपल्या भारतीय संस्कृतीशी जोडला गेला होता, पण त्याला पाश्चात्य संस्कृतीदेखील आवडत असे. त्याला बीटल्स आवडायचे. त्याला मॅड मॅगझीन आवडायचं, त्यामुळे लहानपणी आमच्या घरी भीमसेन आण्णांचं संगीतही सुरू असायचं. त्याचबरोबर वेस्टर्न जाझ, बीटल वगैरेसुद्धा सुरू असायचे." पुढे सखी म्हणाली.

# ‘मुफासा द लायन किंग’ ते झाकिरचा ‘डेलुलू एक्सप्रेस

आजच्या धावपळीच्या युगात अनेकांना चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहणे शक्य होत नाही. ओटीटी(OTT) माध्यमांमुळे आता घरबसल्या स्वत:च्या वेळेनुसार असे चित्रपट पाहता येणे, शक्य झाले आहे. याबरोबरच, अनेक ओटीटी प्लॅटफॉर्म्स सध्या उपलब्ध आहेत. ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर चित्रपटांबरोबरच वेब सीरीजदेखील पाहता येतात. या प्लॅटफॉर्म्सवर दर आठवड्याला विविध वेब सीरीज व चित्रपट प्रदर्शित होत असतात. जाणून घेऊयात आता या आठवड्यात कोणते वेब सीरीज व चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत.तसेच कोणत्या दिवशी व कोणत्या प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहेत, हे जाणून घेऊयात.मुफासा द लायन किंग हा चित्रपट २६ मार्च २०२५ ला प्रदर्शित होणार आहे. ही गोष्ट एका हरवलेल्या सिंहाच्या छाव्याची आहे. जो एकटा पडलेला असतो. त्याची भेट एका सिंहाशी होते. त्याचे नाव टाका असते. या चित्रपटातील पात्रांना बॉलीवूडचा किंग खान शाहरूख खान त्याची दोन्ही मुले आर्यन खान व अबराम खान यांनी आवाज दिलेला आहे. जिओ हॉटस्टारवर या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. आता या चित्रपटाला ओटीटीवर कसा प्रतिसाद मिळणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.लोकप्रिय कॉमेडियन झाकिर खान त्याच्या नव्या शोमधून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. हा शो प्राईम व्हिडीओ या प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. २७ मार्चला हा शो प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. झाकिर खान त्याच्या कवितांसाठी तसेच त्याच्या विनोदांसाठी ओळखला जातो. त्याचा चाहतावर्ग मोठा आहे.

# हवाला पैशांचा वापर करून सोने खरेदी!

सोन्याची तस्करी केल्याच्या प्रकरणात कन्नड अभिनेत्री रान्या रावला बंगळुरूच्या कॅम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर काही दिवसांपूर्वी अटक झाली. या कारावाईनंतर तब्बल १४.८ किलो सोनं जप्त करण्यात आलं होतं. या संपूर्ण प्रकरणामुळे दाक्षिणात्य इंडस्ट्रीत मोठी खळबळ उडाली होती. रान्या राव ही अनेकदा दुबईला ये-जा करत असायची आणि यातूनच पोलिसांना संशय आला आणि डीआरआयने तिच्यावर कारवाई केली. सोन्याच्या तस्करी प्रकरणात आता मोठी माहिती समोर आली आहे. रान्या रावने हवाला पैशांचा वापर करून सोने खरेदी केल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. रान्या रावच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. या सुनावणीवेळी डीआरआयची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी रान्या रावने सोने खरेदीसाठी हवाला पैशांचा वापर केल्याचं कबूल केलं असल्याचं न्यायालयात सांगितलं असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. रान्या रावच्या जामीन अर्जावर सुनावणी पार पडली. मात्र, तिला जामीन मिळणार की नाही? याचा निर्णय बंगळुरू सत्र न्यायालयाने २७ मार्चपर्यंत राखून ठेवला आहे. रान्या रावचा जामीन अर्ज आतापर्यंत दोनदा फेटाळण्यात आला आहे. आता सुनावणीतील युक्तिवाद पूर्ण झाला असून जामिनासंदर्भातील निर्णय न्यायालय २७ मार्च रोजी देणार आहे. त्यामुळे रान्या रावला दिलासा मिळणार की नाही? हे २७ मार्चला स्पष्ट होणार आहे.कन्नड अभिनेत्री रान्या रावने १५ दिवसांत चार वेळा दुबई प्रवास केला आणि ती तपास यंत्रणांच्या रडारवर आली. रान्या राववर पोलिसांना संशय आला होता. त्यानंतर तिच्यावर नजर ठेवण्यात आली. त्यानंतर ३ मार्च रोजी रान्या रावला बेंगळुरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली. यावेळी तिची झडती घेण्यात आली तेव्हा ती सोन्याची तस्करी करत असल्याची माहिती समोर आली. तिच्याकडून तब्बल १२ कोटीपेक्षा जास्त रुपयांचं सोनं आढळून आलं होतं. यानंतर तिच्या घराचीही झडती घेण्यात आली, तेव्हा तिच्या घरीही देखील २ कोटी रुपयांच्या सोन्याचे दागिने आढळून आले होते. दरम्यान, या प्रकरणात तिला अटक करण्यात आली असून ती अद्याप तुरुंगात आहे. रान्या राव ही दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. तिने कन्नड आणि तामिळ भाषेतील अनेक चित्रपटांमध्ये काम केलेलं आहे. हिंदुस्तान पोस्टच्या वृत्तानुसार, रान्या रावचे सावत्र वडील के रामचंद्र राव हे वरिष्ठ आयपीएस अधिकारी आहेत. सध्या ते कर्नाटक राज्य पोलीस दलात महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. रान्या रावचा जन्म कर्नाटकातील चिकमंगलूर या गावात झाला.



# गुजरातविरुद्ध पंजाबच 'किंग्ज'!

## श्रेयस अय्यरची तडाखेबंद खेळी; अर्शदीप सिंगच्या भेदक गोलंदाजी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयपीएल 2025 मध्ये प्रीती झिंटाच्या पंजाब किंग्जने विजयाने सुरुवात केली आहे. पंजाबने गुजरात टायटन्सचा 11 धावांनी पराभव केला. पंजाब किंग्जच्या 243 धावांच्या प्रत्युत्तरात गुजरातचा संघ फक्त 232 धावा करू शकला. आधी पंजाबकडून श्रेयस अय्यर आणि शशांक सिंग यांचा तांडव पाहिला मिळाला. त्यानंतर वेगवान गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली.**



अर्शदीप सिंगने 36 धावा देत 2 विकेट घेतल्या. मॅक्सवेल आणि जॅन्सन यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. पण पंजाबच्या विजयाचे मुख्य कारण विजय कुमार वैशाख होते, ज्याला एकही विकेट घेतली नाही. परंतु डेथ ओव्हर्समध्ये 2 उत्कृष्ट षटके टाकण्यात यश मिळवले. त्याने 3 षटकांत 28 धावा दिल्या पण गुजरातकडून सामना हिसकावून घेतला.गुजरात टायटन्सच्या पराभवाचे मुख्य कारण शेरफेन रदरफोर्ड होता, ज्याने 28 चेंडूत 46 धावा केल्या पण त्याने महत्त्वाच्या क्षणी खूप जास्त डॉट बॉल खेळले. यामुळे गुजरात संघावर दडपण आले. रुदरफोर्डने डॉट बॉल खेळल्यामुळे गुजरातच्या इतर फलंदाजांवर दबाव आला. या दबावाखाली, बटलर 54 धावा करून बाद झाला. यानंतर, राहुल तेवतिया धावबाद झाला आणि अखेर गुजरात सामना गमावला. तसे, गुजरात टायटन्सकडून साई सुदर्शनने 41 चेंडूत 74 धावांची खेळी केली. त्याच्या बॅटमधून 6 षटकार आणि 5 चौकार आले. शुभमन गिलने 14 चेंडूत 33 धावा केल्या. त्याने 3 षटकार आणि 2 चौकारही मारले. बटलरने 31 चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. त्याने 33 चेंडूत 54 धावा केल्या. प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्जने 20 षटकांत 243 धावा केल्या. अय्यरने फक्त 42 चेंडूत 97 धावांची खेळी खेळली. यादरम्यान, त्याने 9 षटकार मारले. त्याच्याशिवाय शशांक सिंगने फक्त 16 चेंडूत 44 धावा केल्या. प्रियांश आर्यनेही 23 चेंडूत 47 धावा केल्या. गुजरातचे गोलंदाज खूप महागडे ठरले. सिराजने 4 षटकांत 54 धावा दिल्या. रशीद खानने 4 षटकांत 48 धावा दिल्या. प्रसिद्ध कृष्णाच्या 3 षटकांत 41 धावा झाल्या. अर्शद खानने एका षटकात 21 धावा दिल्या. रबाडाने 41 धावा दिल्या. फक्त साई किशोरने 4 षटकांत फक्त 30 धावा देत 3 बळी घेतले.

### अय्यरचे शतक 3 धावांनी हुकले

श्रेयस अय्यरची 97 धावांची तडाखेबंद खेळी आणि अर्शदीप सिंगच्या भेदक गोलंदाजीच्या बळावर पंजाब किंग्जने मंगळवारी रंगलेल्या हाय स्कोअरिंग आयपीएल साखळी सामन्यात गुजरात टायटन्सचा 11 धावांनी पराभव केला. प्रारंभी, पंजाबने निर्धारित 20 षटकांत 5 बाद 243 धावांचा डोंगर रचला, तर प्रत्युत्तरात गुजरातला 5 बाद 232 धावांवर समाधान मानावे लागले.विजयासाठी 244 धावांचे आव्हान असताना साई सुदर्शनने 74 धावा फटकावल्या. शुभमन गिलने जलद 33 धावांचे योगदान दिले, तर जोस बटलरने शानदार अर्धशतक झळकावत 54 धावा वसूल केल्या. शेरफेन रुदरफोर्डनेही 28 चेंडूंत जलद 46 धावा केल्या. मात्र, यानंतरही त्यांचा संघ विजयापासून दूरच राहिला. अर्शदीपने 2, तर मार्को जान्सेन, ग्लेन मॅक्सवेल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. तत्पूर्वी, श्रेयस अय्यरचे शतक अवघ्या 3 धावांनी हुकले.

# दिल्लीच्या ऐतिहासिक विजयाचा हिरो!

## संघाबाहेर झाल्यानंतर आशुतोष शर्मा कोचमुळे गेला होता नैराश्यात

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली कॅपिटल्सने आयपीएलच्या इतिहासातील एका थरारक विजयाची नोंद केली आहे. लखनौविरूद्ध झालेल्या यंदाच्या पहिल्या सामन्यात दिल्लीने एका विकेटने अनपेक्षित विजय मिळवला आहे. लखनौने प्रथम फलंदाजी करताना दिल्लीला विजयासाठी २१० धावांचे लक्ष्य दिले होते.**



१० षटकांच्या आत दिल्लीचा निम्मा संघ तंबूत परतला असला तरी खालच्या फळीतील फलंदाजांनी हार मानली नाही आणि दिल्लीने ३ चेंडू राखून लखनौवर एका विकेटने विजय नोंदवला. दिल्लीच्या विजयाचा हिरो ठरला आशुतोष शर्मा. पण हा नवा फिनिशर आहे तरी कोण? जाणून घेऊया.आशुतोष शर्मा हे नाव आयपीएलमध्ये तसं नवीन नाही आणि त्याच्या कामगिरीचा प्रत्यय गतवर्षी सर्वांनीच घेतला. आशुतोष गेल्या वर्षी पंजाब किंग्सच्या ताफ्यात होता आणि २०२४ मध्ये गुजरात जायंट्स संघाविरूद्ध शशांक सिंगच्या मदतीने अशीच खेळी करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

दिल्लीसाठी या सामन्यातही आशुतोष शर्मा इम्पॅक्ट प्लेअर म्हणून उतरला होता आणि संघाचा मॅचविनर ठरला.दिल्ली कॅपिटल्सने ६ विकेट्स गमावलेले असताना आशुतोष शर्मा इम्पॅक्ट प्लेअरच्या रूपात मैदानावर उतरला. आशुतोष शर्माने गतवर्षी आयपीएलमध्ये केलेल्या कामगिरीची सर्वांनाच कल्पना होती आणि दिल्लीला देखील त्याच्याकडून अशाच कामगिरीची अपेक्षा होती. आशुतोष शर्माने सुरूवातीला संथ सुरूवात केली, तोपर्यंत विपराज निगमने उत्कृष्ट फटके खेळत त्याला वेळ दिला आणि यानंतर दोघांनी मिळून संघाचा डाव सावरला. आशुतोषने विजयी षटकार लगावत संघाला ३ चेंडू राखून विजय मिळवून दिला. आशुतोषने त्याच्या वादळी खेळीच्या जोरावर दिल्लीला आयपीएल इतिहासातील अनोखा विजय मिळवून दिला.

आशुतोषने ३१ चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांसह संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली.आशुतोष शर्माचा जन्म १५ सप्टेंबर १९९८ ला रतलाम मध्यप्रदेशमध्ये झाला. आशुतोषला लहानपणापासूनच क्रिकेटची खूप आवड होती. आशुतोष एक उत्तम फलंदाज आणि गोलंदाजही आहे. त्याने मध्यप्रदेशकडून क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

### लखनौवर 3 चेंडू राखून विजय

आशुतोष मध्यप्रदेशकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो. त्याने मध्यप्रदेशसाठी अंडर-१६ पासून क्रिकेट खेळत आहे. आयपीएलमधील इम्पॅक्ट प्लेअर नियमामुळे आशुतोषला खेळण्याची संधी मिळाली आणि त्याने आपल्या कामगिरीची छाप पाडली.पण २०२० मध्ये मध्यप्रदेश संघामधून त्याला बाहेर पडावे लागले. याबद्दल सांगताना आशुतोष २०२४ आयपीएलमध्ये म्हणाला होता, "२०१९ मध्ये मी पुद्दुचेरीविरुद्ध खेळताना माझ्या शेवटच्या सामन्यात एमपीसाठी ८४ धावा केल्या. त्यानंतर पुढच्या वर्षी, एक व्यावसायिक प्रशिक्षक आले आणि त्यांच्या स्वतःच्या आवडी-निवडी होत्या. त्यांना मी आवडत नसल्याने मला संघातून काढून टाकले. या घटनेने मी प्रचंड नैराश्यात गेलो होतो. त्यावेळी चंद्रकांत पंडित संघाचे कोच झाले होते.यानंतर आशुतोषला त्याच्या लहानपणीच्या क्रिकेट कोचने साथ दिली. कोच भूपेन चौहान यांनी त्याच्या कठिण काळात त्याला साथ दिला. १० षटकांच्या आत दिल्लीचा निम्मा संघ तंबूत परतला असला तरी खालच्या फळीतील फलंदाजांनी हार मानली नाही आणि दिल्लीने ३ चेंडू राखून लखनौवर एका विकेटने विजय नोंदवला. दिल्लीच्या विजयाचा हिरो ठरला आशुतोष शर्मा. संघाविरूद्ध शशांक सिंगच्या मदतीने अशीच खेळी करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
। दि. 26 मार्च 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# मोरया शिक्षण संस्था

## Computer Vacation Batch



**ADMISSIONS OPEN 2025-26**

| | | | |
|---|---|---|---|
| 'C' भाषा ₹ १३००/- | 'C++' भाषा ₹ १३००/- | बेसिक जावा ₹ १३००/- | स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/- |
| बेसिक टॅली ₹ १५००/- | एम.एस. ऑफिस ₹ १५००/- | कोरल ड्रॉ ₹ ११००/- | Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/- |

सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.

**ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100**


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+ NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+ CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+ 17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+ TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+ 13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


WTE
Provider of Sustainable
Water and Waste Water Treatment Solution Globally


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
CREATIVE
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Website : www.http://mastermindglobalschool.com